RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक ८] शुक्रवार, जानेवारी ११, २०१९/पौष २१, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २०१९.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन. २०१८/प्र.क्र.९१ /ज-१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८ च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (चार), (दहा), (चौदा) आणि (त्रेसष्ठ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजले आहे, त्या नियमांचा पुढील मसूदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी त्याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसूदा दिनांक ११ फेब्रुवारी २०१९ किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकास अथवा त्यापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींकडून प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

## नियमांचा मसुदा

१. या नियमांना, "महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) (सुधारणा) नियम २०१८" असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ७ च्या पोट-नियम (२) नंतर पुढीलप्रमाणे पोट-नियम समाविष्ट करण्यात येत आहे :—

Ë(३) (अ) राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून पोट-नियम (१) अन्वये अथवा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या जमीन महसूल विषयक कोणत्याही विधिच्या उपबंधान्वये अथवा अन्यथा, क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा, या प्रयोजनासाठी एक रुपया (रु. १) या नाममात्र दराने अथवा सवलतीच्या दराने वार्षिक भुईभाडे आकारून, भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण मूळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तींच्या अधीन राहून, अशा जमिनीवरील भाडेपट्ट्यांचे ३० वर्षे इतक्या कालावधीपर्यंत, महाराष्ट्र मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजार मूल्य ठरवणे) नियम, १९९५ अन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार अशा जमिनीच्या येणाऱ्या मुल्यांकनाच्या दहा टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाड्याची रक्कम म्हणून आकारून नूतनीकरण करण्यास संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम राहतील :

परंतु, बृहन्मुंबई क्षेत्रातील अशा भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण राज्यशासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय जिल्हाधिकारी यांना करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, संबंधित भाडेपट्टाधारकाने अशा भाडेपट्ट्यातील अटी व शर्तींचा भंग केला असल्याचे निदर्शनास आल्यास, अशा भाडेपट्ट्याचे नूतनीकरण, राज्यशासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय संबंधित जिल्हाधिकारी यांना करता येणार नाही.

(ब) या नियमांमधील तरतुदीनुसार किंवा अन्यथा, क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा यांच्या उभारणीसाठी एक रुपया (रु. १) या नाममात्र दराने वार्षिक भुईभाडे आकारून अथवा सवलतीच्या दराने भुईभाडे आकारून भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्ट्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर, जर संबंधित शासकीय जमीन शासनास अथवा शासनाच्या नामनिर्देशित कोणत्याही शासकीय यंत्रणांना, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनार्थ अथवा सार्वजनिक प्रकल्पाकरिता आवश्यक असेल, तर अशी जमीन परत ताब्यात घेण्याची मुभा जिल्हाधिकारी यांना राहील आणि अशा जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करणे जिल्हाधिकाऱ्यास किंवा राज्य शासनास बंधनकारक राहणार नाही. Š

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th January 2019.

*NOTIFICATION*

LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin 2018/C.R.91/J-1.—The following draft of rules, further to amend the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses *(iv),(x), (xiv),* and (*lxiii*) of sub-section (*2*) of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the dated **11th February 2019.**

**2.** Any objections or suggestions which may be received by the Additional Chief Secretary (Revenue), to the Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

DRAFT RULES

**1.** These rules may be called the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) (Amendment) Rules, 2019.

***2.*** In rule 7 of the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, after sub-rule (2), the following sub-rule shall be added, namely : –

" (**3**) ***(a)*** Subject to the general or special order of the State Government, leases granted under sub-rule (1) or under the provisions of any law relating to land revenue in force immediately before the commencement of the code or otherwise, for the purpose of playground or gymnasium at a nominal annual lease rent of one rupee (Rs.1) or at concessional rate, may be renewed by the Collector for a period of thirty years on the same terms and conditions specified in instrument of grant of lease, at annual lease rent of 0.1 per cent. of ten per cent of market value of such land as per the current Annual Statement of Rates published under the provisions of the Maharashtra Stamp (Determination of True Market Value of Property) Rules, 1995 :

Provided that, such leases within the area of Greater Mumbai shall not be renewed by the Collector without prior approval of the State Government :

Provided further that, where it is found that the lessee has committed breach of the terms and conditions of such lease, the concerned Collector shall not renew such lease without the prior approval of the State Government.

***(b)*** On expiry of lease period, if the land leased out for playground or gymnasium under the provisions of these rules or otherwise at a nominal annual lease rent of one rupee (Rs.1/-) or at a concessional rate is required by Government or any Government agency authorized by

Government for any public purpose or public project then, such land may be resumed by the Collector and renewal of such lease shall not be binding upon the Collector or the State Government. ”

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.